मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# अजित गव्हाणेंचा झाला 'अभिमन्यू'

## अजित पवार यांच्या 'चक्रव्युव्हात' अडकले अजित गव्हाणे : माजी आमदार विलास लांडे यांनी काढली फुग्यातील हवा!



**पिंपरी | प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणूक विचारात घेऊन राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी अजितदादांचा हात सोडून शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला. गव्हाणे यांच्या दाव्याने राष्ट्रवादीत भूकंप झाला आणि प्रचंड उलथापालथ झाली, असे चित्र निर्माण केले जात होते. मात्र, माजी आमदार विलास लांडे यांनी गव्हाणेंच्या बंडाच्या फुग्यातील हवा काढून घेतली. त्यामुळे राजकीय चक्रव्यव्हात गव्हाणेंचा 'अभिमन्यू' झाला आहे का? अशी चर्चा राजकीय वर्तुळात जोर धरु लागली आहे.

अजित गव्हाणे यांचे 'गॉडफादर' असलेले माजी आमदार विलास लांडे यांना राज्यपाल नियुक्त १२ आमदारांत संधी देण्याचे आश्वासन अजित पवार यांनी दिले आहे भाजपमध्ये ४४ वर्षांच्या अमित गोरखे यांच्या सारख्या कार्यकर्त्याला विधान परिषदेवर संधी मिळते, इथे आम्ही ३०-३५ वर्षे लढतोय. आता पुन्हा महापालिका जिंकायची तर विधान परिषद मिळायला पाहिजे, असे वाटते, अशा भावना विलास लांडे यांनी बोलून दाखवल्या.. आता लांडे अजित पवारांसोबत झाल्यास भोसरीतील महायुतीची ताकद इंचभरसुद्धा कमी होणार नाही. सुमारे १ लाख मतांचे धनी असलेले विलास लांडे भाजपाचे विद्यमान आमदार महेश लांडगे यांच्या विजयाचे शिल्पकार होतील, असे राजकीय जाणकार सांगतात.

"अजित गव्हाणे यांचे काका म्हणून विलास लांडे हेसुध्दा त्यांच्या बरोबर असतील"अशी सर्वांचीच अपेक्षा होती. लांडे यांची भूमिका अत्यंत महत्वाची समजली जाते. गव्हाणे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना याला जाहीरपणे दुजोरा दिला होता. पण, आज अजित पवार यांच्याबरोबर पक्षातील माजी नगरसेवकांची एक बैठक पुणे सर्किटहाऊसवर पार पडली. अजितदादांच्या आश्वासनामुळे त्यावेळी लांडे हे जातीने हजर होते. पुढची दिशा २१ जुलै रोजी पिंपरी चिंचवड शहरात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत आयोजित मेळाव्यात ठरणार आहे.

### काय म्हणाले विलास लांडे?

» विधान परिषदेवर नियुक्तीसाठी अजितदादांकडे मागणी केली, त्यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. भाजपमध्ये ४४ वर्षांच्या अमित गोरखे यांच्या सारख्या कार्यकर्त्याला विधान परिषदेवर संधी मिळते, इथे आम्ही ३०-३५ वर्षे लढतोय. आता पुन्हा महापालिका जिंकायची तर विधान परिषद मिळायला पाहिजे, असे वाटते, अशा भावना विलास लांडे यांनी बोलून दाखवल्या.

# शरदचंद्र पवार साहेबांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य विजयी संकल्प मेळाव्याचे आयोजन

## येत्या विधानसभा निवडणुकीत शहरातील तीनही विधानसभांमध्ये महाविकास आघाडीचे उमेदवार निवडून आणणार : शहराध्यक्ष तुषार कामठे



**पिंपरी | प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर देशाचे लोकनेते आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेबांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य विजयी संकल्प मेळाव्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पिंपरी चिंचवड शहर जिल्हा कार्यकारिणीच्या वतीने आयोजन करण्यात आले आहे. परवा म्हणजेच येत्या शनिवारी दि. 20 जुलै 2024 रोजी शहराच्या मध्यवर्ती भागात नवमहाराष्ट्र महाविद्यालय पिंपरीगाव या ठिकाणी सायंकाळी ठीक 4.00 वाजता या भव्य विजयी संकल्प मेळाव्याचे आयोजन केले असून पावसाळ्याच्या दिवसांमुळे नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी कार्यक्रमस्थळी भव्य असा वॉटरप्रूफ सभामंडप उभारण्यात आला आहे, शिवाय 12 ते 15 हजार नागरिकांच्या बसण्याची व्यवस्थाही करण्यात आली आहे. अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी तुषार कामठे म्हणाले, लोकसभा निवडणुकीत मायबाप जनतेच्या आशीर्वादाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे दहापैकी तब्बल आठ खासदार संसदेत खासदार म्हणून निवडून आले, त्यानंतर आदरणीय शरद पवार साहेब प्रथमच पिंपरी चिंचवड शहरात अशा भव्य कार्यक्रमासाठी येत आहेत. आदरणीय पवार साहेबांच्या उपस्थितीत या कार्यक्रमात येणाऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये पिंपरी चिंचवड शहरातील भोसरी, पिंपरी व चिंचवड या तीनही विधानसभांमध्ये महाविकास आघाडीचे उमेदवार प्रचंड बहुमतांनी निवडून येतील असा विजयी संकल्प करण्यात येणार आहे.

देशाला वाचविण्यासाठी तसेच संविधान रक्षण करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्रभर निर्भय बनो चळवळीच्या माध्यमातून जनजागृती करून मोलाचे योगदान देणारे मा. ॲड. असीम सरोदे, मा. विश्वंभर चौधरी, वरिष्ठ पत्रकार संजयजी आवटे या मान्यवरांचाही यावेळी सन्मान करण्यात येणार आहे, अशी माहिती तुषार कामठे यांनी पत्रकारांना दिली. यावेळी एमआयएम पक्षाचे शहराध्यक्ष धम्मराज साळवे यांनी एमआयएम पक्षाच्या सर्व पदांचा राजीनामा दिला असून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करत असल्याचे जाहीर केले.

### नवनिर्वाचित आठ खासदारांचाही सन्मान

» पिंपरी चिंचवड शहराच्या विकासाचे शिल्पकार म्हणून सर्वश्रुत असणाऱ्या आदरणीय शरद पवार साहेबांनी गेल्या पन्नास वर्षांच्या कार्यकाळात पिंपरी चिंचवड शहराचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी दुरदृष्टीय धोरणात्मक निर्णय घेतले आहेत, या सर्व कार्यकाळात शहरातील कित्येक पितृतुल्य ज्येष्ठ मान्यवरांची शरद पवार साहेबांना भक्कम साथ लाभली, अशा शरद पवार साहेबांच्या सर्व जुन्या सहकाऱ्यांचा सन्मान यावेळी करण्यात येणार आहे. दुर्दैवाने आज हयात नाहीत अशा ज्येष्ठ सहकाऱ्यांच्या स्मृतिगंध स्वरूपी आठवणींनाही यावेळी उजाळा देण्यात येईल. त्याचबरोबर नवनिर्वाचित आठ खासदारांचाही सन्मान यावेळी केला जाणार आहे.

आयोजित पत्रकार परिषदेत पक्षाचे प्रदेश प्रवक्ते रविकांतजी वर्पे, प्रदेश युवक सरचिटणीस प्रशांत सपकाळ, पिंपरी चिंचवड कार्याध्यक्ष देवेंद्र तायडे, युवक अध्यक्ष इम्रान शेख, महिला अध्यक्ष ज्योतीताई निंबाळकर, नव्यानेच पक्षात प्रवेश घेतलेले मा. नगरसेवक अजित गव्हाणे, पंकज भालेकर, धनंजय भालेकर यांच्यासह विनायक रणसुभे, उपाध्यक्ष दिलीप पानसरे, उपाध्यक्ष मोहम्मद अली सय्यद, विशाल भाई जाधव, राजरत्न शिलवंत, सचिन गायकवाड, पक्षाचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# मनोरमा खेडकरला धमकी प्रकरण पडलं महागात!

## मनोरमा खेडकरवर जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचे कलम ,कोर्टाकडून 2 दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली

**पुणे | प्रतिनिधी**

वादग्रस्त प्रशिणार्थी आयएएस डॉ. पूजा खेडकर यांच्यासह त्यांच्या कुटंबातील व्यक्तींबाबत नवनवे खुलासे होत आहेत. काही दिवसांपूर्वी पूजा खेडकर यांच्या आई डॉ. मनोरमा खेडकर यांनी मुळशी तालुक्यातील पौड येथे एका शेतकऱ्याला पिस्तुल दाखवून धमकवल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला होता. यानंतर त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर पुणे पोलिसांशी देखील हुज्जत घालत असल्याचा देखील त्यांचा व्हिडिओ व्हायरल झाला होता.

यानंतर पोलिस त्यांचा तपास करत होते, अखेर मनोरमा खेडकर यांना रायगडमधून ताब्यात घेतले आहे. पूजा खेडकरच्या बाणेर येथील बंगल्यावर जाऊन पोलिसांनी मनोरमा खेडकर असल्याची पाहणी केली होती. त्यावेळी घराच्या गेटवरती कुलूप लावल्याचे निर्दशनास आले. त्यांचा फोन देखील बंद असल्याचं समोर आलं होतं. त्यानंतर पोलिसांची ३ पथकं मनोरमा खेडकरसह इतरांचा शोध घेत होते.

अखेर पुणे ग्रामीण पोलिसांनी मनोरमा खेडकरला अटक करण्यात आले. मनोरमा खेडकर महाड तालुक्यातील हिरकणवाडीमधील पार्वती हॉटेलमध्ये लपून बसल्या होत्या. त्यानंतर आज पहाटेच्या सुमारास पोलिसांचं पथक हॉटेलवरती दाखल झालं त्यानंतर मनोरमा खेडकरला अटक करण्यात आली.

वादग्रस्त IAS अधिकारी पूजा खेडकरची आई मनोरमा खेडकरला आज सकाळी पुणे ग्रामीण पोलिसांनी महाडमधून ताब्यात घेतलं. स्थानिक पोलीस ठाण्यात नोंद करुन तिला पुण्याला आणण्यात आले. त्यानंतर सर्व प्रक्रिया पुर्ण करून तिची वैद्यकिय तपासणी करण्यात आली आहे. त्यानंतर पोलिसांनी मनोरमा खेडकरला कोर्टात हजर केलं होतं. पोलिसांनी कोर्टात मनोरमा खेडकरला 7 दिवसांची पोलिस कोठडी द्यावी अशी मागणी केलेली मात्र कोर्टाकडून 2 दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली.



### मनोरमा खेडकरच्या अडचणीत वाढ

» मनोरमा खेडकरवर जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचे कलम 307 वाढवण्यात आले आहे. आधी फक्त शेतकऱ्यांना धमकावल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. नवीन कलम वाढ झाल्यामुळे मनोरमा खेडकरच्या अडचणीत वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आता या संपूर्ण प्रकरणामध्ये आता मनोरमा खेडकरच्या अडचणी वाढल्या आहेत.मनोरमा खेडकरसोबत तिचे पती दिलीप खेडकर यांच्यावरती देखील गुन्हा दाखल आहे, मात्र ते देखील गायब आहेत त्यांचाही पोलिस शोध घेत आहेत.

### काय आहे नेमके प्रकरण?

» एक वर्षापूर्वी मुळशी तालुक्यातील धडवली गावात मनोरमा खेडकर या शेतकऱ्यांना पिस्तूल रोखून मारहाण करण्याचा व्हिडिओ काल सोशल माध्यमातून व्हायरल झाला होता.यानंतर पुणे ग्रामीण पोलिसांनी मोठी कारवाई करत या मारहाण आणि पिस्तूल प्रकरणात पोलिसांनी पूजा खेडकरचे आई-वडील,काका व काही बाऊन्सर यांच्यावर गंभीर गुन्हा दाखल केला आहे.याप्रकरणी पंढरीनाथ कोंडीबा पासलकर ( वय ६५ वर्षे, रा.मु पो केडगाव (आंबेगाव पुनवर्सन ) ता.दौड,जि,पुणे ) यांनी फिर्याद दिली आहे.पंढरीनाथ पासलकर व मारूती मरगळे यांना मारहाण, शिवीगाळ करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला.तसेच दहशत निर्माण करण्यासाठी पिस्तूल बाहेर काढले होते. असे फिर्यादीत नमूद करण्यात आले होते.

### पुणे ग्रामीण पोलिसांची कारवाई

» अखेर पुणे ग्रामीण पोलिसांनी मनोरमा खेडकरला अटक करण्यात आले. मनोरमा खेडकर महाड तालुक्यातील हिरकणवाडीमधील पार्वती हॉटेलमध्ये लपून बसल्या होत्या. त्यानंतर आज पहाटेच्या सुमारास पोलिसांचं पथक हॉटेलवरती दाखल झालं त्यानंतर मनोरमा खेडकरला अटक करण्यात आली. पुणे ग्रामीण पोलिसांचं पथक मनोरमा खेडकर यांना घेऊन पुण्याच्या दिशेने रवाना झाले

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बैठकीस 120 हून जास्त पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित

## चिंचवड येथील रागा पॅलेस येथे 18 जुलै रोजी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचा मेळावा जाहीर

**पुणे | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहर (जिल्हा) राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने गुरुवार (दि.18 जुलै) रोजी पक्षातील आजी-माजी नगरसेवक, नगरसेविका, सेल अध्यक्ष व प्रमुख पदाधिकारी यांची बैठक महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पुणे येथे आयोजित करण्यात आली होती.

पिंपरी चिंचवड शहरातील सध्याची राजकीय परिस्थिती पाहता सन 1986 ते 2022 पर्यंतच्या सर्व माजी नगरसेवक आणि नगरसेविका यांना बैठकीसाठी निमंत्रित करण्यात आले होते एकूण 120 माजी नगरसेवक बैठकीस उपस्थित होते. आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने बैठकीत चर्चा करण्यात आली. शहरातील तीनही विधानसभा मतदारसंघाचा आढावा बैठकीत घेण्यात आला.

पुढे बोलताना ते म्हणाले की, एस.सी.,एस.टी. तसेच अल्पसंख्याक, ओबीसी, तसेच इतर समाजामधील कुटुंबातील मुले-मुली हे शिक्षणापासून वंचित राहता कामा नये, म्हणून सरकारने अनेक योजना आणल्या आहेत, त्या योजना राबविण्यासाठी व त्यांची अंमलबजावणीसाठी आपण व आपली संघटना तत्पर असली पाहिजे.

तसेच, (दि.21 जुलै) रोजी चिंचवड येथील रागा पॅलेस येथे पक्षाचा मेळावा आयोजित करण्यात आलेला आहे. सदर मेळाव्यापूर्वी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे प्रत्येक आजी-माजी नगरसेवक सेल अध्यक्ष, पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्याशी व्यक्तिशः बोलणार आहेत.



### अजित पवार यांचे उपस्थितांना संबोधिन

» ठकीत महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मार्गदर्शन करताना उपस्थितांना संबोधित केले. पक्षाच्या संघटनात्मक बांधणीच्या दृष्टिकोनातून सर्वांनी काम केले पाहिजे, पक्षाची ध्येय, धोरणे समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्यासाठी आपण सर्वजण प्रयत्नशील असले पाहिजे, राज्याला विकासाच्या माध्यमातून पुढे नेण्यासाठी सर्वसामान्य जनतेची कामे करण्यासाठी आम्ही महायुतीच्या वतीने वेगवेगळे धोरणात्मक निर्णय घेत आहोत, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना हा त्याचाच एक भाग( आहे.

# शहरात नोंद नसलेल्या दोन लाख मालमत्ता

## पिंपरी-चिंचवड महापालिकेचा अंदाज : नोंद लावण्यासाठी होणार सुनावणी, सात ठिकाणी सुनावणी केंद्र



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात तब्बल दोन लाख नवीन आणि वाढीव बांधकामाची नोंद नसल्याचा महापालिकेचा अंदाज आहे. सर्वेक्षणात केलेल्या मालमत्तांची कर आकारणी करण्यात येणार आहे. याकरिता मालमत्ताधारकांना विशेष नोटीस देण्यात येत आहेत. त्यामुळे ज्या मालमत्ताधारकांची कर आकारणीवर हरकत, आक्षेप असतील, त्या नागरिकांनी सुनावणीसाठी सुविधा केंद्रावर जाऊन आक्षेप घ्यावेत, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

महापालिकेच्या वतीने शहरातील नवीन, वाढीव अशा मालमत्तांचे सर्वेक्षण सुरू केले आहे. या सर्वेक्षणात आढळलेल्या मालमत्ताधारकांना विशेष नोटीस देण्यात येत आहे. ज्या मालमत्ता धारकांचे कर आकारणीबाबत हरकत, आक्षेप असतील, अशा मालमत्ताधारकांच्या सुनावणीसाठी शहरातील विविध भागात सात ठिकाणी सर्व सुविधांयुक्त केंद्र निश्चित केले आहेत. त्या नागरिकांना ऑफलाईन, ऑनलाईनद्वारे आक्षेप घेता येणार आहे.

महापालिकेच्या कर संकलन कार्यालयात ६ लाख ३० हजार नोंदणीकृत मालमत्ता आहेत. मात्र त्यानंतरही महापालिका हद्दीत नोंदणी नसलेल्या सुमारे दोन लाख नवीन आणि वाढीव बांधकाम असलेल्या मालमत्ता आढळण्याचा महापालिका प्रशासनाचा अंदाज आहे. त्यामुळेच आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह आणि अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांनी नवीन, वाढीव अशा मालमत्तांचा ड्रोनच्या सहाय्याने सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार मालमत्ता सर्वेक्षणासाठी महापालिकेने स्थापत्य कन्सल्टंट प्रा. लि. कंपनीची नियुक्ती केली असून सर्वेक्षणास प्रारंभ झाला आहे.

सर्वेक्षणात आढळलेल्या नवीन मालमत्ताधारकांना कर आकारणीबाबत पहिली विशेष नोटीस बजावण्यात आली आहे. या नोटीसबाबत मालमत्ताधारकांची काही हरकत, आक्षेप असल्यास संबंधित झोन कार्यालयात लेखी तक्रार दाखल करता येईल. यासाठी महापालिकेने सात ठिकाणी सुनावणी केंद्र निश्चित केले आहेत. सुनावणीसाठी आक्षेप असलेल्या आपल्या मिळकतीची सर्व कागदपत्रे मालमत्ता धारकांनी आणल्यानंतर तत्काळ सुनावणी घेण्यात येणार आहे. दरम्यान, महापालिकेने केलेल्या सर्वेक्षणात पहिल्या टप्प्यात २४ हजार नवीन आणि वाढीव मालमत्ता धारकांना प्रथम विशेष नोटीस बजावली आहे. या आठवड्यात ३० हजार आणि ३१ जुलैपर्यंत ७५ हजार जणांना प्रथम विशेष नोटीस देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

### ही आहेत सुनावणीची सात ठिकाणे

- वाकड, थेरगाव, किवळे, कस्पटे वस्ती- वाकड विभागीय कार्यालय (नवीन कार्यालय इमारत), तेजस इंपेरीया, वाकड पोलीस चौकी शेजारी, भुजबळ चौक, वाकड.
- आकुर्डी, निगडी, चिंचवड- आकुर्डी विभागीय कार्यालय-पांडुरंग काळभोर सभागृह, पांढारकर नगर, आकुर्डीगाव.
- सांगवी, मनपा भवन, फुगेवाडी- दापोडी- फुगेवाडी-दापोडी विभागीय कार्यालय मनपा दवाखाना इमारत, पहिला मजला, रेल्वे गेट जवळ, कासारवाडी.
- तळवडे, चिखली- तळवडे विभागीय कार्यालय-श्री. स्वामी समर्थ सांस्कृतिक भवन, सेक्टर नं. २१, शिवभूमी विद्यालयाजवळ, यमुनानगर, निगडी.
- मोशी, भोसरी-मोशी विभागीय कार्यालय (नवीन कार्यालय इमारत) सन हार्मोनी, तळमजला गाळा क्र.१ ते ४, शिवाजीवाडी, मोशी.
- दिघी, चऱ्होली- दिघी विभागीय कार्यालय लोटस पॅराडाईज, पहिला मजला, दत्तनगर, दिघी.
- पिंपरी वाघेरे, पिंपरी नगर- जुने दुय्यम निबंधक कार्यालय इमारत कै. नंदकुमार जाधव उद्यान समोर, अशोक चित्रमंदिर जवळ, पिंपरी.

# शहरातील 51 लाभार्थी योजनेपासून वंचितच

## मुदतीत प्रस्ताव दाखल करूनही नाकारले अर्ज : संजय गांधी निराधार योजनेत ज्येष्ठ नागरिकांची नाराजी



**पिंपरी | प्रतिनिधी**

निगडी येथील अप्पर तहसील कार्यालयातील संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत अर्ज स्वीकारले जातात. शहरातील ज्येष्ठ नागरिक या ठिकाणी सकाळपासून अर्जासाठी येत असतात. मुदतीच्या आत प्रकरण सादर करूनही यावर्षीच्या उत्पन्नाच्या दाखल्याची मागणी करीत असल्याने नाहक त्रास सहन करावा लागत असल्याची खंत कार्यालयात आलेल्या ज्येष्ठांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

कार्यालयात योजनेतील तब्बल ५१ लाभार्थींचे प्रकरणे अपात्र झाल्याने ज्येष्ठांनी नाराजी व्यक्त केली आहे. ३१ मार्च अखेर शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून राबवण्यात येणाऱ्या योजनेमध्ये संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना आदी प्रकारच्या योजनेमध्ये निराधार, वृद्ध व्यक्ती, अंध, दिव्यांग शारीरिक व मानसिक आजाराने ग्रस्त व्यक्ती, निराधार, विधवा, परित्यक्ता, अनाथ बालके, सिकलसेलग्रस्त, भूमिहीन, शेतमजूर इत्यादींनी जीवनमान सुसह्य करण्यासाठी शासनाने राबवलेल्या मासिक अर्थसहाय्य योजनेतसहभाग घेऊन प्रकरणे सादर करण्यात आली होती.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी पिंपरी, चिंचवड, देहूरोड, आकुर्डी यासह लगतच्या परिसरातून ज्येष्ठ नागरिक येत असतात. या योजनेसाठी कर्मचारी अपुरी असल्याने नागरिकांची कामे होत नाहीत. त्यातच विविध कारणांनी अर्ज नाकारले जात आहेत. लोकसभेच्या निवडणुकीमुळे आचारसंहिता, १३ मे मतदान, ४ जून निकाल यामुळे शासकीय यंत्रणा ठप्प झाली होती. तसेच त्यापूर्वी देखील निवडणुकीच्या कामकाजाचे कारण सांगून येथील कर्मचारी उपलब्ध नव्हते. त्यानंतर संजय गांधी निराधार योजनेच्या कार्यालयात राबवण्यात आलेल्या योजनेची प्रकरणे हाताळून वरिष्ठाच्या आदेशानुसार लाभार्थ्यांना पुन्हा यावर्षीचे उत्पन्न दाखले जोडण्यासाठी शेरे देण्यात आले आहेत.

दिलेल्या मुदतीच्या ३१ मार्च अखेर प्रकरण सादर करताना २०२३-२०२४ या वर्षीचा उत्पन्न दाखला प्रकरणाला जोडण्यात आले होते. मात्र प्रकरण अपात्र ठरवून पुन्हा २०२४-२०२५ या वर्षीचा उत्पन्न दाखला प्रकरणाला जोडण्यासाठी येथील कार्यालयातील संबंधित अधिकार्यांकडून सांगण्यात आले.

> “ आचारसंहिते अभावी ३१ मार्च अखेरीस प्रकरणे पाठवण्यास विलंब झाला. त्यामुळे निवडणुकीच्या कामकाजामुळे अर्ज वेळेवरती पोहोचू शकले नाहीत. याबाबत वरिष्ठांकडे मार्गदर्शन मागवली आहे. नागरिकांना दिलासा देण्यासाठी प्रयत्न केला जाईल.
> **- चंद्रकला शेळके, कार्यालय कर्मचारी, संजय गांधी निराधार योजना.**

# महापालिकेच्या आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप

## महापालिकेचा आरोग्य विभाग कोणत्या ना कोणत्या कारणावरून सातत्याने चर्चेत

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेचा आरोग्य विभाग कोणत्या ना कोणत्या कारणावरुन सातत्याने चर्चेत आहे. आरोग्य विभाग प्रमुखपदावरून तर चांगलीच गटबाजी सुरु आहे. गेल्या काही दिवसात आरोग्यप्रमुख डॉ. भगवान पवार यांचे निलंबन झाल्याने विभागाची चर्चा सर्वत्र होत आहे. त्यानंतर आता आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आले आहेत. ज्या अधिकाऱ्यांवर आरोप करण्यात आले आहेत, त्यांना तात्काळ खुलासा करण्याचे आदेश दिले असून उत्तर देण्यास दोन दिवसांची मुदत देण्यात आली आहे.



> रुग्ण हक्क परिषदेने आरोग्य विभागाकडे काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांविरोधात तक्रार केली आहे. तक्रार आल्यानंतर त्यावर कार्यवाही करणे बंधनकारक असते. तक्रारीत करण्यात आलेल्या आरोपानुसार संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना खुलासा करण्यास सांगण्यात आले आहे. आरोग्य विभागाने दिलेली नोटीस ही कारणे दाखवा नोटीस नसून तो खुलासा मागवण्यात आला आहे. अतिरिक्त आयुक्त किंवा आयुक्तांच्या आदेशाने कारणे दाखवा नोटीस देता येते. तशी नोटीस देण्यास सांगण्यात आले तर ती देण्यात येईल. मात्र सध्या कोणतीही कारणे दाखवा नोटीस नाही तर फक्त खुलासा मागवलेला आहे. नोटीस बजावली असून त्यांना उत्तर देण्यास दोन दिवसांचा कालावधी देण्यात आला आहे. त्यांचे उत्तर आल्यानंतर याबाबतचा अहवाल अतिरिक्त आयुक्तांकडे सादर केला जाईल.
>
> **- डॉ. कल्पना बळिवंत, प्रभारी आरोग्य प्रमुख, पुणे महापालिका.**

आरोग्य विभागातील सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. मनीषा नाईक, लिपिक मनोज पानसे आणि शिपाई बाबा इनामदार यांच्यावर रुग्ण हक्क परिषदेने तक्रार केल्यानुसार भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आले आहेत. या तक्रारीची दखल घेत प्रभारी आरोग्य प्रमुख डॉ. कल्पना बळिवंत यांनी थेट या तक्रारीबाबत खुलासा करण्याचे आदेश दिले आहेत. त्यावर योग्य खुलासा न आल्यास अतिरिक्त आयुक्त आणि आयुक्तांच्या मार्गदर्शनानुसार पुढील कार्यवाही केली जाईल असे सांगण्यात येत आहे. त्यामुळे आरोप झालेल्या अधिकाऱ्यांकडून नेमका काय खुलासा येणार याकडे लक्ष लागलेले आहे. रुग्ण हक्क परिषदेने प्रभारी आरोग्य प्रमुख डॉ. बळिवंत यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीनुसारच खुलासा सादर करण्यास सांगण्यात आले आहे.

शहरी गरीब योजना खिळखिळी करण्याचे काम सुरू आहे. गरीब रुग्णांना या योजनेचा लाभ मिळत नसल्याने त्यांना मोठा आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. आरोग्य विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी शहरातील मोठ्या रुग्णालयांकडून या योजनेची देयके मंजूर करून घेण्यासाठी मोठी लाच स्वीकारली आहे. त्यामुळे त्यांचे निलंबन करून त्यांची चौकशी करावी. असे आरोग्य प्रमुखांकडे केलेल्या तक्रारीत नमूद करत भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आले आहेत.

# रामवाडी मेट्रो स्टेशनवर खासगी पार्किंग!

## मेट्रोकडून पार्किंगची व्यवस्था नसल्याने दुचाकी चालकांना भुर्दंड : प्रवाशांकडून विरोध

**पुणे | प्रतिनिधी**

नगर रस्त्यावरील पुणे महामेट्रोच्या रामवाडी स्टेशनवर महामेट्रोकडून पार्किंगची सोय केली नसल्याचा फायदा उचलत एका व्यक्तीने खासगी पार्किंगची व्यवस्था केली असल्याचा प्रकार समोर आला आहे. याला मेट्रो प्रवाशांकडून विरोध होत आहे.




**मेट्रो आणि महापालिकेने अधिकृत पार्किंग सुरु करावे**

» पोलिसांकडून नो पार्किंगचे फलक लावून दुचाकीचालकांवर कारवाई केली जात आहे. वाहतूक पोलिसांच्या कारवाईमुळे आता खासगी पार्किंग चालकांचे हित साधले जाणार आहे. पोलिसांनी सहकार्य करुन या रस्त्यावर पार्किंग धोरण ठरवले तर त्याचा फायदा प्रवाशांना आणि प्रशासनाला होणार आहे. याचा विचार करुन लवकरात लवकर या स्टेशनखाली अधिकृत पार्किंगला मान्यता देऊन मेट्रो प्रशासन आणि महापालिकेने प्रवाशांना दिलासा द्यावा, अशी मागणी या मार्गावरील प्रवासी संदेश शिंदे यांनी केली.

रामवाडी स्टेशनवर नो पार्किंग झोन करण्यात आला आहे. शेकडो संख्येने दुचाकीचालक रामवाडी स्टेशनखाली दुचाकी पार्क करुन मेट्रोने प्रवास करत आहेत. नो पार्किंगमध्ये दुचाकी लावल्याने वाहतूक पोलिसांकडून कारवाई केली जात आहे. याचा फायदा घेवून या स्टेशनजवळ एकाने खासगी जागेत पार्किंगची व्यवस्था केली आहे. पोलीस कारवाईच्या भीतीपोटी खासगी पार्किंगचा वापर दुचाकीचालकांना करावाच लागणार आहे. मेट्रोच्या तिकीटाचे आणि पार्किंगचे पैसे जवळपास सारखेच आहेत. त्यामुळे एका प्रवासासाठी दुप्पट पैसे खर्च करावे लागणार आहेत. त्यामुळे या स्टेशनखाली पार्किंग झोन करुन प्रवाशांचा विचार करावा, अशी मागणी प्रवाशांनी केली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वनाज ते रामवाडी या विस्तारित मेट्रो मार्गाला हिरवा झेंडा दाखविण्यात आल्यानंतर हा मार्ग वाहतुकीसाठी खुला झाला. मुख्य शहरात येण्यासाठी वाहतूक कोंडीला तोंड द्यावे लागू नये, म्हणून प्रवाशांकडून या मार्गाला मोठा प्रतिसाद मिळत आहे. परंतु रामवाडी मेट्रो स्टेशनजवळ नो पार्किंग झोन करण्यात आल्यामुळे दुचाकीचालक मेट्रो प्रवाशांना वाहतूक पोलिसांच्या कारवाईला सामोरे जावे लागत असून भुर्दंड सहन करावा लागत आहे. त्यामुळे रामवाडीपासून पुढे मेट्रोने प्रवास करण्यासाठी प्रवाशांना तिकीटापेक्षा अधिक पैसे दंड आणि आता खासगी पार्किंगलातच भरावे लागणार आहेत. त्यामुळे काही दिवसांत या मार्गाला असलेला प्रवाशांचा प्रतिसाद कमी होऊ शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

पुणे महापालिकेने आणि मेट्रो प्रशासनाने संयुक्तपणे प्रवाशांच्या सोयीचे धोरण स्वीकारण्याची गरज आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात येणाऱ्या दुचाकीचालकांची संख्या मेट्रोमुळे कमी होऊन वाहतूक कोंडी कमी होऊ शकते. सार्वजनिक वाहतूकीला जेवढा जास्त प्रतिसाद मिळेल तेवढ्या प्रमाणात वाहतूक कोंडी कमी होणार आहे. याचा विचार करुन प्रशासनाने रामवाडीच नव्हे तर शहरातील प्रत्येक स्टेशनखाली पार्किंगची व्यवस्था करणे आवश्यक आहे, असे प्रवाशांचे म्हणणे आहे.

वनाझ ते रामवाडी या मेट्रो मार्गामुळे पूर्व पुणे आणि पश्चिम पुणे मेट्रोच्या सहाय्याने जोडले गेले आहे. या मार्गिकेमुळे विमाननगर, येरवडा, कल्याणीनगर, चंदननगर, शास्त्रीनगर, खराडी, वडगाव शेरी, तळेगाव या भागातील नागरिकांना फायदा होत आहे. या मार्गिकेमुळे वनाझ ते रामवाडी असा १४.५ किलोमीटरचा प्रवास अवघ्या ३६ मिनिटांत करणे शक्य होत आहे. तसेच मेट्रोचे प्रवासभाडेही आवाक्यात आहे. त्याचबरोबर रामवाडी स्थानकाच्या परिसरात असणाऱ्या आयटी कर्मचाऱ्यांना प्रवास करणे सुलभ होत आहे. मात्र वाहतूक पोलिसांकडून कारवाई होत असल्याने वाहनचालक त्रासले आहेत.